पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी -१८
क्र.प्रशा/२/कावि/३८७/२०१५
दि.०५/१०/२०१५

विषय - 'ड' क्षेत्रीय कार्यालयासाठी अतिक्रमण पथक नियुक्ती करणेबाबत.

आदेश,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात व्यावसायिकांकडून विविध प्रकारचे अतिक्रमण वाढत असल्याचे निदर्शनास येत आहे.त्यामुळे नागरिकांना विविध समस्यांना सामोरे जावे लागत आहे.पिंपरी चिंचवड शहरामधील रस्त्यांवर मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण होत असून यामध्ये दिवसेंदिवस वाढत असलेल्या अतिक्रमणांमुळे शहरात वाहतूकीस अडथळा निर्माण होऊन अपघाताचे प्रमाण वाढत आहे.त्यामुळे सन्माननिय सदस्य,नागरिक यांच्या तक्रारींमध्ये वाढ होत आहे.या अतिक्रणांद्वारे निर्माण होणा-या शहरातील विविध समस्या आणि वाहतूकीस निर्माण होत असलेल्या अडचणी दूर होण्यासाठी अतिक्रमण पथकाचे सक्षमीकरण करणेबाबत क्षेत्रीय अधिका-यांना निर्देश दिलेले आहेत.याकरीता 'ड' क्षेत्रीय कार्यालयाचे कार्यक्षत्रातील अतिक्रमणांचे तात्काळ निराकरण करणेकामी अतिक्रमण पथकाची नियुक्ती करण्यात येत आहे.या अतिक्रमण पथकात पुढील प्रमाणे कर्मचारी असेल.

| अनु.क्र. | कर्मचा-याचे नाव | पद |
|---|---|---|
| १. | श्री.बुधले गणेश नारायण | कार्यालय अधिक्षक/ पथकप्रमुख |
| २. | श्री.सुभेदार सदाशिव पंढरीनाथ | मुख्य लिपिक |
| ३. | श्री.कदम मोहन शिवाजीराव | मुख्य लिपिक |
| ४. | श्री.देवकर विठ्ठल तुकाराम | वाहनचालक |
| ५. | श्री.पाटील संजय भास्कर | वाहनचालक |
| ६. | श्री.पहुजा विशाल टेकचंद | मजूर |
| ७. | श्री.गरुड सुधाकर बबनराव | मजूर |
| ८. | श्री.शेख सज्जाद मुस्तफा | मजूर |
| ९. | श्री.पडवळ राजेंद्र बापूराव | मजूर |
| १०. | श्री.फणसे नंदकुमार ज्ञानेश्वर | मजूर |
| ११. | श्री.जुनवणे संतोष नारायण | मजूर |
| १२. | श्री.बुचडे नेताजी सुर्याजी | मजूर |
| १३. | श्री.कस्पटे सुरेश ओंकार | मजूर |

क्षेत्रीय कार्यालयाचे कार्यक्षेत्रात आढळून येणा-या अतिक्रमणां संदर्भात सदर पथकाने पुढील प्रमाणे कामकाज करावयाचे आहे.

१.मोकळ्या जागा,फुटपाथ,रस्त्यावरील अतिक्रमणे हटविणे
२.टप-या,तीनचाकी व चार चाकी वाहनांद्वारे होणारे व्यावसायिक अतिक्रमणे हटविणे
३.अनाधिकृत जाहिरात फलक,फ्लेक्स,बॅनर्स,होर्डींग हटविणे
४.अनधिकृत स्टॉल,रसवंतीगृहे,निरा विक्री केंद्र हटविणे
५.उक्त स्वरुपाची अतिक्रमणे तातडीने हटविणेकामी योग्य ती कारवाई करणे त्या अनुषंगाने स्थळ दर्शविणारे फोटो घेणे,,अतिक्रमणासंदर्भात पंचनामा करणे,अतिक्रमणे हटविणे अपवादत्मक परिस्थितीत फौजदारी गुन्हे दाखल करणे
६.अतिक्रमण कारवाईकरुन संबंधितांकडून विहित प्रशासकीय शुल्क वसूल करणे त्याची रजिस्ट मध्ये नोंद घेवून कोषागारात रोजचे रोज भरणा करणे
७.अतिक्रमण विषयक कारवाईचा दैनंदिन अहवाल कार्यालयीन अधिक्षक यांचेमार्फत कार्यालयास सादर करणे
८.यासंपुर्ण कामकाजावर प्रशासन अधिकारी यांचे नियंत्रण राहिल.प्रशासन अधिकारी यांनी अतिक्रमण कारवाईबाबतचा अहवाल क्षेत्रीय अधिका-यांकडे सादर करावा.
९.क्षेत्रीय अधिकारी यांनी क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात अतिक्रमण पथकामार्फत करण्यात आलेल्या कारवाईबाबतचा अहवाल अतिक्रण मुख्य कार्यालय येथील अतिक्रमण प्रमुख यांचेकडे सादर करावा

तरी अतिक्रमण पथकातील कर्मचा-यांनी त्यांना नेमून दिलेले कामकाज हे दुपारी १ ते संध्याकाळी ९ या वेळेत कारवायाचे आहे..सदर कामकाजात हलगर्जीपणा झाल्यास कडक कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सही/-
(राजीव जाधव)
आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ०१८

प्रति,
१.सर्व संबंधित कर्मचारी

प्रत,
१.लेखा विभाग, २.लेखापरिक्षण विभाग, ३.अतिक्रमण विभाग(मुख्य कार्या)
४.अ,ब,क,ड,इ व फ क्षेत्रीय कार्यालय ५.दूरसंचार ६.माहिती व जनसंपर्क विभाग
७.सर्व संबंधित विभाग

प्रशासन अधिकारी(१)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी -१८